माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १९३/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. राहुल चंद्रकांत भारती**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (अंमल-२),**
परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई एमटीएनएल इमारत, फाऊन्टेन -२ इमारत,
५ वा मजला, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा परिवहन उपायुक्त (अंमल-२)**
परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई एमटीएनएल इमारत, फाऊन्टेन -२ इमारत,
५ वा मजला, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०४.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २०.०३.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००२०२२ प्रकरणी आयोगाने दि.०१.०४.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

२. उक्त आदेशाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांनी माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे दि. २३.०५.२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. १७.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (अंमल- २), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई एमटीएनएल इमारत, फोर्ट, मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (अंमल- २), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई एमटीएनएल इमारत, फोर्ट, मुंबई यांच्याकडून आयोगास अहवाल अप्राप्त आहे.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांचा ईमेल दि. २३.०३.२०२६ रोजी आयोगास प्राप्त झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि.०१.०४.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, आयोगाचे आदेशाप्रमाणे तक्रारकर्ता यांना हवी असलेली माहिती दि. ०१.०४.२०२६ रोजी परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून माहिती पाठविण्यात आलेली आहे. सदर कार्यासनात नियमित अधिकारी (जन माहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी) नसल्यामुळे माहिती देण्यास विलंब झालेला आहे. सदर विलंब हा हेतुपुरस्सरपणे झालेला नाही

..२/-

त्यामुळे आपणास नम्र विनंती करण्यात येते की, सदर झालेला विलंब क्षमापित करण्यात यावा. तसेच यापुढे अशा प्रकारचा विलंब होणार नाही याची पुरेपुर काळजी घेण्यात येईल.

४. या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०२.०४.२०२६**